महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

जा.क्र. तंशिविकापु/लले/लोकआयुक्त/२०२२/ 179 दिनांक : 07.07.2022

प्रति,

१. प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुख,
पुणे विभाग

२. उपसचिव,
म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पणे

**विषय : लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत**

संदर्भ : १. शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एलपीएल-१२०२/प्र.क्र.५६/२००२/१५, दिनांक २०.०६.२००२
२. संचालनालयाचे पत्र क्र. १६/आस्था/लोकआयुक्त/२०२२/१९९, दिनांक ०१.०७.२०२२

उपरोक्त संदर्भ क्र. १ परिपत्रकान्वये महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम १९७१ अन्वये लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत देण्यात आलेल्या एकत्रित सूचनांचे व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

करीता लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचेकडून प्राप्त होणाऱ्या कामकाजाबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून याबाबत निष्काळजीपणा केला गेला किंवा कालमर्यादेचे उल्लंघन केले गेले असे निदर्शनास आल्यास त्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या गोपनीय अभिलेख्यामध्ये नोंद घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : संदर्भीय पत्र

१. प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

ईमेल द्वारे

पत्र क्रमांक : १६/आस्था/लोकआयुक्त/२०२२/९८८ दिनांक : 1 JUL 2022

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्याकडून प्रापत होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत..

संदर्भ : शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एलपीएल १२०२/प्र.क्र.५६/२००२/१५, दि.२०.०६.२०२२

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन परिपत्रक पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

सदर परिपत्रकान्वये महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम १९७१ अन्वये लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत देण्यात आलेल्या एकत्रित सूचनांचे व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

करीता लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचेकडून प्राप्त होणाऱ्या कामकाजाबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. ज्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून याबाबत निष्काळजीपणा केला गेला किंवा कालमर्यादेचे उल्लंघन केले गेले असे निर्दशनास आल्यास त्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या गोपनीय अभिलेख्यामध्ये नोंद घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करावा.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :
संचालनालयातील सर्व कार्यासने

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय
आवक क्रमांक - 257
दिनांक - 01.07.2022

संगणक सांकेतांक - २०१७०५०२१२१२५०१३०७

लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एलपीएल-१२०२/प्र.क्र. ५६ /२००२/१५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० जून २००२

पहा :- शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. एलपीएल-१०००/प्र.क्र. १११/२०००/१५,दि. ८ मार्च २००१

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम १९७१ अन्वये लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत एकत्रित सुचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

१) लोक आयुक्त व उप लोक आयुक्त ही पदनामे यथोलेखानुसार लिहिणे.
२) लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालयाशी पत्रव्यवहार करावयाची कार्यपध्दती.
३) लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांना केलेल्या शिफारशीवरील अनुपालन अहवाल विहित मुदतीत पाठविणे.
४) लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांनी सादर केलेल्या विशेष अहवालावरील कार्यपध्दती.
५) लोक आयुक्त तसेच उप लोक आयुक्त यांचेकडील सुनावणीच्यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे.
६) लोक आयुक्त तसेच उप लोक आयुक्त यांना तक्रारी / गाऱ्हाणी यांच्यासंदर्भात अन्वेषणासाठी कागदपत्र उपलब्ध करून देणे.
७) लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीवरील अनुपालन अहवाल सक्षम अधिकाऱ्यांमार्फतच पाठविणे.

D-16

विधी मंडळाच्या कामकाजास जसे प्राधान्य दिले जाते तसे प्राधान्य लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्या कामकाजाला देण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत. तथापि, उपरोक्त बाबींसंदर्भात विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन काही विभाग / कार्यालयाकडून होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

वास्तव, उपरोक्त परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचा पुनरुच्चार करण्यात येत आहे. सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख तसेच कार्यालय प्रमुख यांनी लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचेकडून प्राप्त होणाऱ्या कामकाजाबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. ज्या अधिकाऱ्यांकडून /कर्मचाऱ्यांकडून याबाबत निष्काळजीपणा केला गेला किंवा कालमर्यादेचे उल्लंघन केले गेले असे निदर्शनास येईल त्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या गोपनीय अभिलेखामध्ये सदर बाबीची नोंद घ्यावी.

या परिपत्रकातील सूचना सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या कृपया निदर्शनास आणाव्या.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वालवे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुंबई,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुंबई,
शासनाचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव,
शासनाचे सर्व प्रधान सचिव / सचिव,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, (पत्राने)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग /कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.